(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठी अनुवाद )

शिव कुमारी देवेंद्र ओझा

-विरुद्ध -

रामाजोर शितला प्रसाद ओझा आणि इतर

13 जानेवारी 1997

[न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति जी. टी. नानावती]

*दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 : कलम 25.*

*सर्वोच्च न्यायालय- प्रकरणे वर्ग करण्याचे अधिकार - दिवाणी न्यायाधीश, वलसाड यांच्या समोर उत्तराधिकार अर्ज प्रलंबित- याचिकाकर्त्याने प्रतापगड जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीशाकडे प्रकरण वर्ग करण्यासाठी याचिका दाखल केली- याचिकाकर्ती एक महिला असल्यामुळे प्रवास करण्यास असमर्थ होती आणि खर्च भागवतानाही अडचण येईल असे कारण देत- उत्तरवादी प्रवास आणि मुक्कामासाठी तिचा खर्च उचलण्यास तयार - निर्णय दिले, अशा परिस्थितीत प्रकरण वर्ग करणे समर्थनीय नाही- उत्तरवादींना प्रत्येक प्रसंगी ७५०/- याचिकाकर्तीस देण्याचे निर्देश जारी केले- -वलसाड येथे वकील नियुक्त करण्यासाठी उत्तरवादींकडून आर्थिक मदतीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी याचिकाकर्तीला स्वातंत्र्य.*

मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र : वर्ग करण्यासाठी याचिका (दिवाणी) क्रमांक : 281/1996

( भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 139 ए (1)/(2) अंतर्गत)

याचिकाकर्तीसाठी सुश्री आशा जैन मदान

उत्तरवादींसाठी आर. डी. उपाध्याय.

न्यायालयाने पुढीलप्रमाणे न्यायनिर्णय दिले.

याचिकाकर्तीने दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वलसाड, गुजरात यांच्याकडे 'रामाजोर शितला प्रसाद ओझा आणि इतर - विरुद्ध - शिव कुमारी देवेंद्र ओझा' या शीर्षकाने प्रलंबित असलेली कार्यवाही म्हणजे उत्तराधिकारासाठी अर्ज क्र. ४३/९५ सोबत संकीर्ण अर्ज क्रमांक २३/९६, उत्तर प्रदेशातील सदर, जिल्हा प्रतापगढ येथील दिवाणी न्यायाधीशांच्या

सक्षम न्यायालयाकडे वर्ग करण्यासाठी  ही याचिका दाखल केली आहे. प्रकरण अद्याप प्रलंबित आहे की निकाली निघाला आहे हे शोधण्यासाठी आम्ही 9 डिसेंबर 1996 रोजी दिलेल्या आमच्या आदेशाद्वारे हे प्रकरण तहकूब केले होते. हे प्रकरण अद्याप प्रलंबित असून दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांनी अद्याप प्रकरण हाती घेतलेले नाही, असे सांगण्यात आले आहे. याचिकाकर्तीच्या विद्वान अधिवक्त्याने  असे कथन केले की याचिकाकर्ती ही एक महिला असल्याने उत्तर प्रदेशातून गुजरातमधील वलसाड येथे प्रवास करण्यास असमर्थ आहे आणि त्यासाठीचा खर्च पूर्ण करणे तिच्यासाठी खरोखरच एक मोठी अडचण आहे. उत्तरवादींची बाजू मांडणारे विद्वान अधिवक्ता श्री. उपाध्याय यांनी जेव्हा जेव्हा ती न्यायालयात हजर होईल तेव्हा तिच्या प्रवासाचा आणि राहण्याचा खर्च उचलण्यास सहमती दर्शवली आहे. अशा परिस्थितीत, हे प्रकरण प्रतापगड, उत्तर प्रदेश येथे वर्ग करण्याचे कोणतेही समर्थनीय कारण आम्हाला आढळत नाही. जेव्हा जेव्हा याचिकाकर्ती न्यायालयात जाईल, तेव्हा तेव्हा उत्तरवादीकडून याचिकाकर्तीला रु. ७५०/- (सातशे पन्नास रुपये फक्त ) दिले जातील आणि ती रक्कम तिला आगाऊ दिली जाईल. याचिकाकर्ती दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांना कळवतील, जे उत्तरवादींना  याचिकाकर्तीला रक्कम देण्याचे निर्देश देतील.

त्यानंतर असा युक्तिवाद केला जातो की,  याचिकाकर्तीला सुरत येथून तिच्या वकिलाची नेमणूक करावी लागली कारण खटला प्रलंबित असलेल्या वलसाड येथे कोणताही वकील उपलब्ध नसेल.आम्हाला वाटते की याचिकाकर्तीची भीती योग्य नाही. याचिकाकर्तीला वलसाड येथे वकील नियुक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे आणि वकील याचिकाकर्तीच्या प्रकरणाचे बचाव करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. जर याचिकाकर्तीला उत्तरवादींकडून काही आर्थिक मदतीची आवश्यकता असेल, तर या उद्देशासाठी तिला दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वलसाड यांच्या न्यायालयात अर्ज दाखल करण्याची मुभा असेल आणि दिवाणी न्यायाधीशांकडून तसे आदेश दिले जातील. विद्वान दिवाणी न्यायाधीशांना पुनर्संचयित करण्याच्या अर्जाचा त्वरित निपटारा करण्याचे निर्देश दिले जातात आणि ते एकाच वेळी मुख्य प्रकरण हाताळतील आणि  प्रकरण लवकरात लवकर निकाली काढतील.

तदनुसार वर्ग करण्यासाठी याचिका निकाली काढली जाते.

टी. एन. ए                                                                                    याचिका निकाली काढली.

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X